0001

## नियंत्रक शिधावाटप व संचालक नागरी पुरवठा, मुंबई यांचे समोर

**वाचा :-**

१) या कार्यालयाचे दक्षता शाखेकडून दि.३०/१२/२०११ रोजी प्राप्त झालेला अहवाल.

२) या कार्यालयाची "कारणे दाखवा नोटीस" क्र.निशि/अंमल/६-अ/प्र.क्र.८८/२०११/जा.०१, दि. ०२/०१/२०१२, १९/०१/२०१२ व २५/०१/२०१२.

३) अधिकृत शिधावाटप दुकान क्र. २६ ड/२१३ चे प्राधिकारपत्रधारक मोहन एस. कटारमल व अधिकृत शिधावाटप दुकान क्र. २६ ड/२१३ दुकानामधील मदतनीस प्रविण गेला गामी यांचे दि.२४/०१/२०१२ रोजीचे स्वतंत्र लेखी निवेदने.

क्र.निशि/अंमल/६-अ/प्र.क्र.८८/२०११/जा. १६२
नियंत्रक शिधावाटप व संचालक
नागरी पुरवठा यांचे कार्यालय,
रॉयल इन्शुरन्स इमारत, ५ वा मजला,
१४, ज.टाटा मार्ग, चर्चगेट, मुंबई - २०.
दिनांक : २१ /०३/२०१२.

CONTROLLER OF RATIONING & DIRECTOR OF CIVIL SUPPLIES HEAD OFFICE MUMBAI

### आ दे श

(जीवनावश्यक वस्तू कायदा, १९५५ चे कलम ६-अ अवये)

**प्रकरणाची पार्श्वभूमी :-**

दिनांक २७/१२/२०११ रोजी या कार्यालयाच्या फिरते पथकातील अधिकारी/कर्मचारी यांनी पंचासह अधिकृत शिधावाटप दुकान क्र. २६ ड/२१३ या दुकानास भेट दिली. तेथे उपस्थित हजर व्यक्ती प्रविण गेला गामी यांना दुकानाचा साठा व साठा पुस्तकाबाबत चौकशी केली. तसेच दुकानाचे प्राधिकारपत्रधारक मोहन एस. करारमल हे कोठे आहेत, याबाबत विचारले असता, त्याने ते दवाखान्यात गेल्याचे सांगितले. पथकाने पंच व दुकानात हजर व्यक्ती प्रविण गेला गामी यांच्या समक्ष दुकानाची संपूर्ण तपासणी घेण्यास सुरुवात करुन सदर बाबतचा विहित नमुना भरुन घेतला. दरम्यानच्या काळात प्रविण गेला गामी यांच्याकडे अधिकाऱ्यांनी सदर दुकानासंबंधित गोदामाबाबत विचारणा केली असता, त्यांनी "व्ही शेट्टी कंपाऊंड, मिलिटरी रोड, बी.एच. हॉटेल हरिप्रसाद, अंधेरी (पूर्व), मुंबई - ४०० ०५९" येथे असल्याचे सांगितले. अधिकाऱ्यांना अशाच प्रकारच्या माहितीबाबत खबर मिळाल्या कारणाने अधिकाऱ्यांनी त्याच्याकडे अधिक चौकशी केली व अधिकारी वर्ग व पंच सदर ठिकाणी जाऊन गोदामात असलेल्या साठ्याबाबत प्रविण गेला गामा याच्याकडे चौकशी केली असता. त्यांनी पंचासमक्ष कबुल केले की, सदर साठ्यापैकी काही माल सरकारी साठ्याचा आहे. सदर माल कोठून आणतो, असे त्याला विचारले असता, त्याने हातगाडीवाले आणून देतात असे सांगितले. तसेच ५० किलो भरतीची १ गोणी रुपये

६००/- प्रमाणे विकत घेत असल्याचे सांगितले व सदर माल अधिकृत शिधावाटप दुकान क्र. २६ ड/२१३ या दुकानामध्ये किरकोळ भावाने प्रति किलो रुपये १३/- ने विकत असल्याचे अधिकाऱ्यांना पंचासमक्ष सांगितले.

त्यांनी सादर केलेली बिलाच्या छायांकित प्रती अधिकाऱ्यांनी ताब्यात घेतल्या व सदर गोदामात असलेल्या साठ्याची पंचासमक्ष मोजदाद केली असता, ती खालील प्रमाणे आढळली.

| अ. क्र. | जप्त मुद्देमाल तपशिल | नग / साठा | जप्त मुद्देमालाची एकूण किंमत (रुपये) |
|---|---|---|---|
| १ | तांदूळ | ७५०० किलो | १,५०,०००/- |
| २ | गहू | १००० किलो | १५,०००/- |
| ३ | आटा | ४०० किलो | ८,८००/- |
| ४ | शिलाई दाबन | २ नग | २/- |
| ५ | गोण्या शिलाई मशिन | १ नग | २,०००/- |
| ६ | एफसीआय शिक्का असलेल्या रिकाम्या गोण्या | २ नग | २०/- |
| | | एकूण | १,७५,८२२/- |

सदर वस्तूंबाबत प्रविण गेला गामी यांचा जबाब अधिकाऱ्यांनी नोंदवून घेऊन सदर प्रकरणी पुढील कार्यवाही होईपर्यंत सदर माल जसाच्या तसा ठेवण्यासाठी सूपूर्दनामा पंचासमक्ष तयार करुन घेतला व पंचनामा तसेच सुपूर्दनाम्याची प्रत प्रविण गेला गामा यांच्याकडे देण्यात आली.

उपरोक्त जप्त मुद्देमालाची जीवनावश्यक वस्तू कायदा, १९५५ चे कलम ६-अ अन्वये विल्हेवाट लावण्याची विनंती उपनियंत्रक शिधावाटप, अंमलबजावणी यांनी वरील वाचावे क्र.१ मध्ये नमूद केलेल्या अहवालान्वये केली आहे. त्यानुषंगाने जीवनावश्यक वस्तू कायदा, १९५५ चे कलम ६-ब नुसार सर्व संबंधितांना वरील वाचावे क्र. २ मध्ये नमूद केल्याप्रमाणे कारणे दाखवा नोटीस बजावून या प्रकरणी जप्त करण्यात आलेला जीवनावश्यक वस्तुंचा साठा सरकारजमा का करण्यात येऊ नये, याची कारणे स्पष्ट करणारा खुलासा मागविण्यात आला. तसेच मौखिक खुलासा करण्याची संधी म्हणून दि. १७/०१/२०१२ रोजी या कार्यालयात सुनावणी ठेवण्यात आली.

दिनांक १७/०१/२०१२ रोजीच्या सुनावणीस अधिकृत शिधावाटप दुकान क्र. २६ ड/२१३ चे प्राधिकारपत्रधारक मोहन एस. कटारमल व अधिकृत शिधावाटप दुकान क्र. २६ ड/२१३ दुकानामधील मदतनीस प्रविण गेला गामी हे उपस्थित राहिले व त्यांनी त्यांचे लेखी म्हणणे सादर करण्याकरिता सुनावणीची पुढील तारीख मिळण्याची विनंती केली. सबब, पुढील सुनावणी दिनांक २४/०१/२०१२ रोजी ठेवण्यात आली.

दिनांक २४/०१/२०१२ रोजीच्या सुनावणीस अधिकृत शिधावाटप दुकान क्र. २६ ड/२१३ चे प्राधिकारपत्रधारक मोहन एस. कटारमल व अधिकृत शिधावाटप दुकान क्र. २६ ड/२१३ दुकानामधील मदतनीस प्रविण गेला गामी तसेच त्यांच्या वकालतनाम्यासह ॲड. श्री. विक्रम बी. सिंग हे उपस्थित राहिले. अधिकृत

शिधावाटप दुकान क्र. २६ ड/२१३ चे प्राधिकारपत्रधारक मोहन एस. कटारमल व अधिकृत शिधावाटप दुकान क्र. २६ ड/२१३ दुकानामधील मदतनीस प्रविण गेला गामी यांनी वाचावे क्र. ३ अन्वये स्वतंत्र लेखी निवेदने सादर केली.

तसेच सदर सुनावणीस उपस्थित अधिकृत शिधावाटप दुकान क्र. २६ ड/२१३ चे प्राधिकारपत्रधारक मोहन एस. कटारमल यांनी पुढील नमूद जीवनावश्यक वस्तूंची खरेदी बिले सादर केली. १) मे. दलाल धवलकुमार कांतीलाल, ई-६, एपीएमसी मार्केट-२, वाशी, नवी मुंबई - ४०० ७०३ यांचेकडून बिल क्र. ४०८७१, ४०३३४, ४०३३२, ४०३३१, ४०३३०, ४०४८०, ४०७००, ४०३३३ व ४०५७४ अन्वये खरेदी बिले सादर केली आहेत. २) मे. महादेव अग्रो प्रोडक्टस्, ई-६, एपीएमसी मार्केट-२, फेस २, वाशी, नवी मुंबई - ४०० ७०३ यांचेकडून बिल क्र. २७७५२ अन्वये खरेदी बिल सादर केले आहे. ३) मे. सद्गुरु कार्पोरेशन, एम-१७, एपीएमसी मार्केट-२, फेस-२, वाशी, नवी मुंबई - ४०० ७०३ यांचेकडून बिल क्र. ४४०९८, ४४०९६, ४४०९७ व ४४५८९ अन्वये खरेदी बिले सादर केली आहेत. ४) मे. प्रित इंटरप्रायझेस, एम-१४ व जी-२१, एपीएमसी मार्केट-२, फेस-२, वाशी, नवी मुंबई - ४०० ७०३ यांचेकडून बिल क्र. ३४०५१ अन्वये खरेदी बिल सादर केले आहे.

सादर करण्यात आलेल्या उपरोक्त बिलांची पडताळणी केली असता, या बिलांवर वितरण केलेल्या आस्थापनांच्या नावांमध्ये साम्यता आढळून आली नाही. सदर बाब गंभीर असून वरील आस्थापनांकडून सादर करण्यात आलेले बिलांवरील नमूद जीवनावश्यक वस्तूंच्या साठ्यावरील परिमाण व घटनास्थळी जप्त करण्यात आलेला जीवनावश्यक वस्तूंचा साठा यामध्ये तफावत आढळून येत असल्याने नमूद बिलांवरील जीवनावश्यक वस्तूंचा साठा त्यांच्याकडून प्रत्यक्षात अधिकृत शिधावाटप दुकान क्र. २६ ड/२१३ या दुकानास विक्री झाली किंवा कसे, याची अधिक खातरजमा करण्याकरिता, उपरोक्त नमूद बिलांचे मुळ पावतीपुस्तक, त्यांना या विभागाकडून देण्यात आलेला घाऊक परवाना व इतर दस्ताऐवज सादर करण्यासाठी पुढील सुनावणी दि.०८/०२/२०१२ रोजी ठेवण्यात आली. सदर सुनावणीस अधिकृत शिधावाटप दुकान क्र. २६ ड/२१३ चे प्राधिकारपत्रधारक मोहन एस. कटारमल यांनाही बोलाविण्यात आले.

दिनांक ०८/०२/२०१२ रोजीच्या सुनावणीस अधिकृत शिधावाटप दुकान क्र. २६ ड/२१३ चे प्राधिकारपत्रधारक मोहन एस. कटारमल, मे. दलाल धवलकुमार कांतीलालचे मालक कांतीलाल उमरशी, मे. महादेव अग्रो प्रोडक्टस्चे मालक राजेश कानजी मंगे, मे. सद्गुरु कार्पोरेशनचे मालक दिनेश उमरशी मंगे तसेच मे. प्रित इंटरप्रायझेसचे मालक जितेंद्र मोहनलाल भानुशाली हे उपस्थित राहिले. तथापी, त्यांना काहीही सांगावयाचे नसल्याचे सांगून लेखी निवेदन सादर केले नाही. मे. दलाल धवलकुमार कांतीलालचे मालक कांतीलाल उमरशी, मे. महादेव अग्रो प्रोडक्टस्चे मालक राजेश कानजी मंगे, मे. सद्गुरु कार्पोरेशनचे मालक दिनेश उमरशी मंगे तसेच मे. प्रित इंटरप्रायझेसचे मालक जितेंद्र मोहनलाल भानुशाली यांनी सादर केलेले मुळ पावती पुस्तकाचे अवलोकन करता

मे. प्रित इंटरप्रायझेस यांनी दिनांक ०२/१२/२०११ रोजीचे पावती क्र.०३४०५१ चे मुळ पावती पुस्तक सादर केले असता, दोन्ही पावत्यांमध्ये साम्यता आढळून आली नाही. तसेच त्यांनी सादर केलेल्या दि.०२/१२/२०११ व ०३/१२/२०११ च्या पावत्यांवरील नमूद पत्ते वेगळे असल्याचे आढळून आले आहे.

सबब, सदरचे प्रकरण गुणवत्तेवर निर्णयासाठी राखून ठेवण्यात आले.

**युक्तिवाद :-**

दिनांक २४/०१/२०१२ रोजीच्या सुनावणीस उपस्थित अधिकृत शिधावाटप दुकान क्र. २६ ड/२१३ चे प्राधिकारपत्रधारक मोहन एस. कटारमल यांनी युक्तीवाद केला की, दि.२७/१२/२०११ रोजी त्याची तब्येत ठिक नसल्याने तो दवाखान्यात गेला होता व त्याचा व्यवस्थापक हा त्याच्या अधिकृत शिधावाटप दुकान क्र. २६ ड/२१३ मध्ये काम करीत होता. दि.०५/०१/२०१२ रोजी अधिकाऱ्याकडून कारणे दाखवा नोटीस प्राप्त झाल्यानंतर त्यास आर्श्चयजनक धक्का बसला व नोटीसीचे उत्तर दिले नाही. तर त्याचा अन्नधान्य व इतर वस्तूंचा रुपये १,७५,८२२/- किंमतीचा साठा जप्त करण्यात येईल, असे नमूद करुन दि.२७/१२/२०११ रोजीच्या घटनेस अधिकाऱ्यांनी धाडीत रुपातंर केले. हि बाब त्यास मान्य नाही. कारणे दाखवा नोटीसमधील नमूद मुद्दे त्यास मान्य नसून त्याच्या नमूद गोदामामधील अन्नधान्याचा साठा शिधापत्रिकाधारक यांना वितरीत करावयाचा नसून सदरचा साठा त्याने खुल्या बाजारातून खरेदी केलेला असून त्याचे रितसर बिल उपलब्ध असल्याचे नमूद केले. त्याने सदरचा साठा हा खुला बाजारातून खरेदी केला असल्याने त्याने शिधावाटप विभागाचे कोणत्याही कायद्याचा भंग केला नसल्याने सदर कारणे दाखवा नोटीस हि त्यांना बंधनकारक नाही. कारणे दाखवा नोटीसमधील नमूद मुद्दे हे धाड टाकण्यात आली असे श्रुखंला तयार केली आहे व सदर घटनेचा पंचनामा चुकीचा व खोटा असून त्याचा व्यवस्थापक प्रविण गेला गामी याने सदर नोटीसीला उत्तर दिले असून ते त्यास मान्य आहे. त्यामुळे बजावण्यात आलेली कारणे दाखवा नोटीस हि त्याचे व्यवस्थापक प्रविण गेला गामी याने दिलेल्या उत्तरास अनुसरुन मागे घेण्यात यावी, असे नमूद करुन तसे लेखी निवेदन सादर केले व सोबत एपी.एम.सी. मार्केटमधील विविध व्यापाऱ्यांकडील बिले सादर केली.

दिनांक २४/०१/२०१२ रोजीच्या सुनावणीस उपस्थित अधिकृत शिधावाटप दुकान क्र. २६ ड/२१३ दुकानामधील मदतनीस प्रविण गेला गामी यांनी युक्तीवाद केला की, गाळा नं. २, कोटु चाळ, मरोळ गांव, अंधेरी (पूर्व) येथील अधिकृत शिधावाटप दुकान क्र. २६ ड/२१३ या दुकानात निरिक्षकांनी तपासणी घेतल्याच्या अनुषंगाने कारणे दाखवा नोटीसला उत्तर देत आहे. दिनांक २७/१२/२०११ रोजी तो अधिकृत शिधावाटप दुकान क्र. २६

ड/२१३ या दुकानात काम करीत असतांना दुकानाचे मालक मोहन एस. कटारमल हे तब्येत ठिक नसल्याने दवाखान्यात गेले होते. त्यावेळस सुमारे ११:३० वाजता मेहफुज खान यांनी प्रल्हाद गुरव यांचे समवेत दुकानास भेट दिली. त्यांना भेटीचे कारण विचारले असता, त्यांनी नामांकित वृत्तपत्राचे रिपोर्टर अशी स्वत:ची ओळ्ख करुन देऊन जबरदस्तीने दुकाना शेजारी असलेल्या व्हि शेट्टी कंम्पाऊंट, मिलेटरी रोड, बी.एच. हॉटेल, हरिप्रसाद, अंधरी (पूर्व) येथील त्याच्या दुकानाच्या गोदामात घेऊन गेले व त्यांनी त्याच्याकडे रुपये ५०,०००/- ची मागणी करुन तसे न केल्यास शिधावाटप विभागाच्या अधिकारी/निरिक्षक यांच्या मार्फत धाड टाकण्यात येईल, असे सांगितले. तद्नंतर त्याने दुकानाचे मालक हे दवाखान्यात गेले असल्याचे सांगून सद्य:स्थितीत त्याला सदरच्या अवाजवी मागणी पूर्ण करुणे शक्य नसल्याचे सांगितले असता, सदरच्या व्यक्तीने त्याच्या मालकास बोलविण्यात यावे. अन्यथा शिधावाटप यंत्रणेच्या अधिकाऱ्यांकडून धाड टाकण्यात येईल असे सांगितले. तद्नंतर त्याने वारंवार विनंती केली की, त्यास दुकानात जाण्याची परवानगी देण्यात यावी. तेव्हा सदरच्या व्यक्तींनी त्यांच्या साथीदारांना बोलावून रुपये ५०,०००/- मागण्याची धमकी दिली. अन्यथा शिधावाटप अधिकाऱ्यांच्या मदतीने खोटी केस दाखल करुन त्याचे दुकान सिलबंद करण्यात येईल, असे सांगितले व त्यास आरडाओरड न करण्याची धमकी देऊन मारहाण केली. तद्नंतर मेहफुज खान याने भ्रमणध्वनीवरुन संपर्क साधून शिधावाटप अधिकाऱ्यांना बोलावून घेतले. अधिकाऱ्यांना त्याने मेहफुज खान व संजय गुरव हे शिवीगाळ करीत असल्याचे सांगून घटनेची हकीगत सांगितली. तसेच त्यांनी त्याला मारहाण करुन जबरदस्तीने काही कागदपत्रांवर स्वाक्षरी घेतल्याचे सांगितले. सदर कागदपत्रावर मराठी भाषेत लिहिले असतांना त्याबाबत माहिती घेण्याचा प्रयत्न केला असता, त्यांनी धमकी देऊन कागदपत्रांवर त्याची स्वाक्षरी घेतली असल्याचे सांगितले. तसेच त्यांच्या मागणीनुसार रुपये ५०,०००/- न दिल्यास त्याचा साठा जप्त करुन त्यास खोट्या प्रकरणात अडकविण्यात येईल, असे सांगितले. दिनांक २७/१२/२०११ रोजी मेहफुज खान व संजय गुरव यांनी धमकी दिल्याने तो घाबरुन गेला होता. दुसऱ्याच दिवशी तो एम.आय.डी.सी. पोलिस ठाणे येथे सर्व घटनेबाबत लेखी तक्रार करण्यासाठी भेट दिली असता, उपस्थित पोलिस अधिकाऱ्यांनी तक्रार घेण्यास नकार दिला. त्यामुळे दिनांक १२/०१/२०१२ रोजी त्याने संबंधित ए.सी.पी., डी.सी.पी., पोलिस आयुक्त, गृहमंत्री व खाद्यमंत्री यांना तक्रार सादर केली. दि.०५/०१/२०१२ रोजी अधिकाऱ्याकडून कारणे दाखवा नोटीस प्राप्त झाल्यानंतर त्यास आर्शर्यजनक धक्का बसला व नोटीसीचे उत्तर दिले नाही. तर त्याचा अन्नधान्य व इतर वस्तूंचा रुपये १,७५,८२२/- किंमतीचा साठा जप्त करण्यात येईल, असे नमूद करुन दि.२७/१२/२०११ रोजीच्या घटनेस अधिकाऱ्यांनी धाडीत रुपातंर केले. हि बाब त्यास मान्य नाही. कारणे दाखवा नोटीसमधील नमूद मुद्दे त्यास मान्य

नसून त्याच्या नमूद गोदामामधील अन्नधान्याचा साठा शिधापत्रिकाधारक यांना वितरीत करावयाचा नसून सदरचा साठा त्याने खुल्या बाजारातून खरेदी केलेला असून त्याचे रितसर बिल उपलब्ध असल्याचे नमूद केले. त्याने सदरचा साठा हा खुला बाजारातून खरेदी केला असल्याने त्याने शिधावाटप विभागाचे कोणत्याही कायद्याचा भंग केला नसल्याने सदर कारणे दाखवा नोटीस हि त्यांना बंधनकारक नाही. कारणे दाखवा नोटीसमधील नमूद मुद्दे हे धाड टाकण्यात आली असे श्रुखंला तयार केली आहे व सदर घटनेचा पंचनामा चुकीचा व खोटा आहे. त्यामुळे बजावण्यात आलेली कारणे दाखवा नोटीस हि मागे घेण्यात यावी, असे नमूद करुन तसे लेखी निवेदन सादर केले व सोबत एपी.एम.सी. मार्केटमधील विविध व्यापाऱ्यांकडील बिले सादर केली.

दिनांक २४/०१/२०१२ रोजीच्या सुनावणीस अधिकृत शिधावाटप दुकान क्र. २६ ड/२१३ दुकानामधील मदतनीस प्रविण गेला गामी यांनी उपस्थित राहून लेखी जबाब सादर केला की, तो गेली ८ वर्षापासून अधिकृत शिधावाटप दुकान क्र. २६ ड/२१३ या दुकानात मदतनीस म्हणून काम करीत असल्याचे सांगून त्याला कामाचा मोबदला म्हणून प्राधिकारपत्रधारक श्री. मोहन एस. कटारमल यांचेकडून रुपये ७,०००/- या प्रमाणे मासिक पगार मिळत आहे. दि.२७/१२/२०१२ रोजी फिरते पथकातील शिधावाटप निरिक्षक यांनी त्यांना मिळालेल्या खबरीनुसार त्याचे दुकान क्र. २६ ड/२१३ या दुकानाची संपूर्ण तपासणी घेतली. सदर दुकाना शेजारील गोदामात आढळून आलेला तांदूळ व गव्हाच्या साठ्याबाबत असे सांगितले की, सदरचा साठा त्याने हातगाडीवाल्यांकडून खरेदी केला असून सदरचा साठा हातगाडीवाल्यांनी कोठून आणला हे त्याला माहित नसल्याचे सांगून त्याने घटनास्थळी दिलेला जबाब कायम असल्याचे सांगून तपासणीचे दिवशी प्राधिकारपत्रधारक आजारी असल्याने ते तपासणीच्या वेळी हजर नसल्याचे सांगून तसा घडल्या परिस्थितीनुसार सदरचा जबाब खरा व बरोबर आहे, असे सांगून लेखी सादर केला.

<u>निष्कर्ष :-</u>

प्रस्तुत प्रकरणातील अपचारी, साठा मालक यांचा युक्तिवाद, निवेदन व अभिलेखावरील उपलब्ध पुरावादर्शक कागदपत्रे विचारात घेऊन मी खालील प्रमाणे निष्कर्ष काढीत आहे.

प्रस्तूत प्रकरणी, दिनांक २७/१२/२०११ रोजी या कार्यालयाच्या फिरते पथकातील अधिकारी/कर्मचारी यांनी पंचासह अधिकृत शिधावाटप दुकान क्र. २६ ड/२१३ या दुकानास भेट दिली. तेथे उपस्थित हजर व्यक्ती प्रविण गेला गामी यांना दुकानाचा साठा व साठा पुस्तकाबाबत चौकशी केली. तसेच दुकानाचे प्राधिकारपत्रधारक मोहन एस. करारमल हे कोठे आहेत, याबाबत विचारले असता, त्याने ते दवाखान्यात गेल्याचे सांगितले. पथकाने पंच व

दुकानात हजर व्यक्ती प्रविण गेला गामी यांच्या समक्ष दुकानाची संपूर्ण तपासणी घेण्यास सुरुवात करुन सदर बाबतचा विहित नमुना भरुन घेतला. दरम्यानच्या काळात प्रविण गेला गामी यांच्याकडे अधिकाऱ्यांनी सदर दुकानासंबंधित गोदामाबाबत विचारणा केली असता, त्यांनी "व्ही शेट्टी कंपाऊंड, मिलिटरी रोड, बी.एच. हॉटेल हरिप्रसाद, अंधेरी (पूर्व), मुंबई - ४०० ०५९" येथे असल्याचे सांगितले. अधिकाऱ्यांना अशाच प्रकारच्या माहितीबाबत खबर मिळाल्या कारणाने अधिकाऱ्यांनी त्याच्याकडे अधिक चौकशी केली व अधिकारी वर्ग व पंच सदर ठिकाणी जाऊन गोदामात असलेल्या साठ्याबाबत प्रविण गेला गामा याच्याकडे चौकशी केली असता, त्यांनी पंचासमक्ष कबुल केले की, सदर साठ्यापैकी काही माल सरकारी साठ्याचा आहे. सदर माल कोठून आणतो, असे त्याला विचारले असता, त्याने हातगाडीवाले आणून देतात असे सांगितले. तसेच ५० किलो भरतीची १ गोणी रुपये ६००/- प्रमाणे विकत घेत असल्याचे सांगितले व सदर माल अधिकृत शिधावाटप दुकान क्र. २६ ड/२१३ या दुकानामध्ये किरकोळ भावाने प्रति किलो रुपये १३/- ने विकत असल्याचे अधिकाऱ्यांना पंचासमक्ष सांगितले. त्यांनी सादर केलेली बिलाच्या छायांकित प्रती अधिकाऱ्यांनी ताब्यात घेतल्या व सदर गोदामात असलेल्या साठ्याची पंचासमक्ष मोजदाद केली असता, तांदूळ ७५०० किलो, गहू १००० किलो, आटा ४०० किलो, २ शिलाई दाबन, गोण्या शिलाई मशिन, एफसीआय शिक्का असलेल्या रिकाम्या गोण्या असा मुद्देमाल आढळून आला. सदर वस्तूबाबत प्रविण गेला गामी यांचा जबाब अधिकाऱ्यांनी नोंदवून घेऊन सदर प्रकरणी पुढील कार्यवाही होईपर्यंत सदर माल जसाच्या तसा ठेवण्यासाठी सूपूर्दनामा पंचासमक्ष तयार करुन घेतला व पंचनामा तसेच सुपूर्दनाम्याची प्रत प्रविण गेला गामा यांच्याकडे देण्यात आली.

प्रस्तुत प्रकरणी अधिकृत शिधावाटप दुकान क्रमांक २६ ड/२१३ चे प्राधिकारपत्रधारक मोहन एस. कटारमल व दुकानातील मदतनीस प्रविण गेला गामी यांनी केलेले स्वतंत्र खुलासा पहाता, सदर कारणे दाखवा नोटीसमधील नमूद मुद्दे त्यांना मान्य नसून त्यांच्या नमूद गोदामामधील अन्नधान्याचा साठा शिधापत्रिकाधारक यांना वितरीत करावयाचा नसून सदरचा साठा त्यांनी खुल्या बाजारातून खरेदी केलेला असून त्याचे रितसर बिले उपलब्ध असल्याचे नमूद केले, तसेच त्यांनी सदरचा साठा हा खुला बाजारातून खरेदी केला असल्याने त्यांनी शिधावाटप विभागाचे कोणत्याही कायद्याचा भंग केला नसल्याने सदर कारणे दाखवा नोटीस हि त्यांना बंधनकारक नसल्याचे सांगुन ए.पी.एम.सी. मार्केटमधील विविध व्यापाऱ्यांकडील बिले सादर केली.

दिनांक ०८/०२/२०१२ रोजीच्या सुनावणीस अधिकृत शिधावाटप दुकान क्र. २६ ड/२१३ चे प्राधिकारपत्रधारक मोहन एस. कटारमल, तसेच त्यांनी ए.पी.एम.सी मार्केटमधील सादर केलेल्या विविध बिलानुसार

संबंधीत व्यापाऱ्यांना सुनावणीस पाचारण करण्यात आले. मे. प्रित इंटरप्रायझेसचे मालक जितेंद्र मोहनलाल भानुशाली यांनी सादर केलेले मुळ पावती पुस्तकाचे अवलोकन करता दिनांक ०२/१२/२०११ रोजीचे पावती क्र. ०३४०५१ हे मुळ पावती पुस्तकाशी पडताळुन पाहिले असता, दोन्ही पावत्यांमध्ये साम्यता आढळून आली नाही. तसेच मे. दलाल धवलकुमार कांतीलालचे मालक कांतीलाल उमरशी, मे. महादेव अग्रो प्रोडक्टस्चे मालक राजेश कानजी मंगे, मे. सद्‌गुरु कार्पोरेशनचे मालक दिनेश उमरशी मंगे हे सर्व सुनावणीस उपस्थित राहिले. तथापी, त्यांना काहीही सांगावयाचे नसल्याचे सांगून लेखी निवेदन सादर केले नाही. म्हणजेच नमूद गोदामावर जप्त करण्यात आलेला जीवनावश्यक वस्तूंचा साठ्याचा पुरवठा त्यांच्याकडून झालेला नसून अधिकृत शिधावाटप दुकान क्रमांक २६ ड/२१३ चे प्राधिकारपत्रधारक मोहन एस. कटारमल व दुकानातील मदतनीस प्रविण गेला गामी यांनी केवळ सदर व्यापाऱ्यांचे बिले सादर करुन दिशाभूल करण्याचा प्रयत्न केला आहे.

अधिकृत शिधावाटप दुकान क्रमांक २६ ड/२१३ या दुकानातील मदतनीस प्रविण गेला गामी यांनी घटनास्थळी पंचांसमक्ष दिलेल्या जबाबात, नमूद गोदामावरील जप्त साठ्यापैकी काही माल सरकारी साठ्याचा आहे. सदर माल कोठून आणतो, असे त्याला विचारले असता, त्याने हातगाडीवाले आणून देतात असे सांगितले. तसेच ५० किलो भरतीची १ गोणी रुपये ६००/- प्रमाणे विकत घेत असल्याचे सांगितले व सदर माल अधिकृत शिधावाटप दुकान क्र. २६ ड/२१३ या दुकानामध्ये किरकोळ भावाने प्रति किलो रुपये १३/- ने विकत असल्याचे सांगितले आहे. तसेच दिनांक २४/०१/२०१२ रोजीच्या सुनावणीस प्रविण गेला गामी यांनी उपस्थित राहून समक्ष सादर केलेल्या लेखी जबाबात, तो गेली ८ वर्षापासून अधिकृत शिधावाटप दुकान क्र. २६ ड/२१३ या दुकानात मदतनीस म्हणून काम करीत असल्याचे सांगून त्याला कामाचा मोबदला म्हणून प्राधिकारपत्रधारक श्री. मोहन एस. कटारमल यांचेकडून रुपये ७,०००/- या प्रमाणे मासिक पगार मिळत असल्याचे सांगितले. दि.२७/१२/२०१२ रोजी फिरते पथकातील शिधावाटप निरिक्षक यांनी त्यांना मिळालेल्या खबरीनुसार सदर दुकानाशेजारील गोदामात आढळून आलेला तांदूळ व गव्हाच्या साठ्याबाबत असे सांगितले की, सदरचा साठा त्याने हातगाडीवाल्यांकडून खरेदी केला असून सदरचा साठा हातगाडीवाल्यांनी कोठून आणला हे त्याला माहित नसल्याचे सांगून त्याने घटनास्थळी दिलेला जबाब कायम असल्याचे सांगून घडल्या परिस्थितीनुसार सदरचा जबाब खरा व बरोबर आहे असे सांगितले आहे.

प्रस्तूत प्रकरणी, अधिकृत शिधावाटप दुकान क्रमांक २६ ड/२१३ चे प्राधिकारपत्रधारक मोहन एस. कटारमल व दुकानातील मदतनीस प्रविण गेला गामी यांनी सादर केलेले निवेदन मोघम स्वरुपाचे व दिशाभूल

करणारे आहे. प्रविण गेला गामी यांनी घटनास्थळी तसेच या कार्यालयात सुनावणीच्या वेळी समक्ष सादर केलेल्या लेखी जबाबात त्यांनी सदरचा साठा हा सरकारी साठ्यापैकी असल्याचे कबूल करुन सदरचा साठा त्यांनी हातगाडीवाल्यांकडून खरेदी केल्याचे सांगितले आहे. म्हणजेच प्राधिकारपत्रधारक मोहन एस. कटारमल व मदतनीस प्रविण गेला गामी यांनी त्यांच्या अधिकृत शिधावाटप दुकान क्र. २६ ड/२१३ या दुकानात पात्र शिधापत्रिकाधारकांना वितरीत करावयाचे शासन नियंत्रित दराचे अनुदानित शिधाजिन्नस त्यांनी शिधापत्रिकाधारकांना वितरीत न करता संगणमताने सदरचा साठा दुकाना शेजारील अनधिकृत गोदामात गैरमार्गाने साठवणूक करुन नफेखोरीच्या उद्देशाने विक्री करीत असल्याचे सिध्द होत आहे. यावरुन प्राधिकारपत्रधारक मोहन एस. कटारमल यांनी त्यांच्या दुकानातील अन्नधान्यांचा साठा अनधिकृत गोदामावर साठवणूक करुन विक्री करीत असल्याने तसेच प्रविण गेला गामी या अनधिकृत इसमास विनापरवानगी दुकानाचे व्यवहार सांभाळण्यास मदतनीस म्हणून घेतल्याने त्यांनी महाराष्ट्र अन्नधान्य शिधावाटप आदेश, १९६६ अन्वये देण्यात आलेल्या प्राधिकारपत्राच्या शर्तींचा तसेच पर्यायाने जीवनावश्यक वस्तू कायदा, १९५५ चा भंग केल्याचे सिध्द होत आहे. सबब, जप्त करण्यात आलेला संपूर्ण अन्नधान्यांचा साठा हा शासनजमा करण्याच्या निष्कर्षाप्रत मी आलेली आहे.

सबब, उपरोक्त विवेचन विचारात घेऊन मी, नियंत्रक शिधावाटप व संचालक नागरी पुरवठा, मुंबई, मला जीवनावश्यक वस्तु कायदा १९५५ चे कलम ६-अ नुसार प्रदान करण्यात आलेल्या अधिकारान्वये प्रस्तूत प्रकरणी जप्त करण्यात आलेल्या मुद्देमालासंदर्भात खालील आदेश देत आहे.

**<u>आदेश</u> :-**

१) जप्त करण्यात आलेला तांदळाचा संपूर्ण ७,५०० किलो व गव्हाचा संपूर्ण १,००० किलो साठा शासनजमा करण्यात यावा.

२) शासनजमा करण्यात आलेला सदर तांदूळ व गव्हाचा साठा उपनियंत्रक शिधावाटप, ड परिमंडळ, अंधेरी यांनी त्यांच्या कार्यक्षेत्रातील अधिकृत शिधावाटप दुकानांना, पात्र शिधापत्रिकाधारकांना नियंत्रित दराने वितरीत करण्याकरिता द्यावा व येणारी रक्कम शासनजमा करावी.

३) उपरोक्त कार्यवाही करतांना उपनियंत्रक शिधावाटप, ड परिमंडळ यांनी उपरोक्त तांदूळ व गव्हाचा साठा संबंधित अधिकृत शिधावाटप दुकानांच्या पुढील महिन्याच्या नियतनामध्ये दर्शविण्यात यावा.

४) जप्त करण्यात आलेला ४०० किलो आटा, शिलाई दाबण, गोण्या शिलाई मशिन व एफ.सी.आय. शिक्का असलेल्या रिकाम्या गोण्या उपनियंत्रक शिधावाटप, ड परिमंडळ यांनी किरकोळीने विक्री करुन येणारी रक्कम शासनजमा करावी.

वरीलप्रमाणे जप्त मुद्देमालाची विल्हेवाट लावून येणारी रक्कम, उपनियंत्रक शिधावाटप, ड परिमंडळ, अंधेरी यांनी वित्तीय सल्लागार व उपसचिव, अन्न, नागरी पुरवठा व ग्राहक संरक्षण विभाग, मुंबई (Financial Advisor & Dy. Secretary, Food, Civil Supply & Consumer Protection Dept., Govt. of Maharashtra, Mumbai) यांचे कार्यालयाच्या वैयक्तिक ठेव लेख्यात "४४०८" या लेखाशिर्षात जमा करावी.

नियंत्रक शिधावाटप व
संचालक नागरी पुरवठा,
मुंबई.

प्रति,

१) अ.शि.दु.क्र. २६ ड/२१३ चे प्राधिकारपत्रधारक मोहन एस. कटारमल
२) अ.शि.दु.क्र. २६ ड/२१३ या दुकानातील मदतनीस प्रविण गेला गामी
(उपनियंत्रक शिधावाटप, ड परिमंडळ, अंधेरी यांचे मार्फत)

प्रत,

१) उपनियंत्रक शिधावाटप, ड परिमंडळ, अंधेरी यांना कळविण्यात येते की, सदरचे आदेश संबंधीतांवर बजावून त्याची दिनांकित पोच या कार्यालयास तात्काळ सादर करावी. सदर आदेशाची तात्काळ अंमलबजावणी करुन पूर्तता अहवाल तसेच प्रस्तूत प्रकरणी योग्य ती कार्यवाही करुन केलेल्या कार्यवाहीचा अहवाल विनाविलंब या कार्यालयास सादर करावा.
२) वित्तीय सल्लागार व उपसचिव, अन्न, नागरी पुरवठा व ग्राहक संरक्षण विभाग, बंगाली गर्ल्स हायस्कूल, चर्चगेट, मुंबई. यांना माहितीसाठी अग्रेषित.
३) कार्यासन अधिकारी, का.क्र.१०, दुकान शाखा, प्रधान कार्यालय, मुंबई यांना माहितीस्तव अग्रेषित.
४) कार्यासन अधिकारी, का.क्र.५, दक्षता शाखा, प्रधान कार्यालय, मुंबई यांना माहितीस्तव अग्रेषित.
५) निवड नस्ती.

CONTROLLER OF RATIONING & DIRECTOR OF CIVIL SUPPLIES HEAD OFFICE MUMBAI

नियंत्रक शिधावाटप व
संचालक नागरी पुरवठा,
मुंबई.